जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/०५/२०२३
## दि.०६/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

| | |
|---|---|
| **१** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ७१/२०२३,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक नागरीक, वय-५७ वर्षे,रा.७९१,रविवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/०४/२०२३ रोजी सकाळी ०८/५० वा. ७९१,रविवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा सोन्याचे दागिने बनविण्याचा व्यवसाय असुन,यातील नमुद इसम कारागीर कामगार यांचेकडे फिर्यादी यांनी सोन्याचे दागिन्याचे ऑर्डरप्रमाणे सोन्याचे दागिने बनविण्याकरता दिले असताना,सदर इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचेकडील सोन्याचे दागिने न बनवता,सदर दागिन्यांचा अपहार करून,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांनी २२,८०,०००/- रू किंचे दागिन्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संतोष शिंदे ९९२३४३३८२० |
| **२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ११३/२०२३,भादविक २७९,३३८,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट ३(१)१८१,१८४ |
| **फिर्यादी** | सहा.पोलीस निरीक्षक, मदन कांबळे, मार्केटयार्ड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | टेम्पो चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०२३ रोजी गेट नं.०४ जवळ मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद टेम्पो चालक याचेकडे वाहन चालविण्याचा कोणताही परवाना नसताना,त्याने स्वतःचे ताब्यातील टेम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी रस्त्याने पायी जाणारे पादचारी नागरीक वसंत रामचंद्र अवघडे,वय-४५ व त्यांचेसोबत असणारे साथीदार एक अनोळखी इसम या दोघांना धडक देवुन,त्यांना जखमी करून,वसंत अवघडे यांना गंभीर दुखापत करुन,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिंदे ८०८०७७००९० |
| **३** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १३५/२०२३,भादविक २२४ |
| **फिर्यादी** | प्रशांत तांगडकर, पोलीस अंमलदार, आळेफाटा पोलीस स्टेशन,जुन्नर,जि.पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०५/२०२३ रोजी ११/१५ वा.चे दरम्यान वॉर्ड नं.९,बेड नं.२५,(अ),ससुन हॉस्पीटल,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आळेफाटा पोलीस स्टेशन पोलीस अंमलदार म्हणुन नेमणुकीस असुन,आळेफाटा पोलीस स्टेशन गु.रजि.नं.२१८/२०२३,भा.द.वि.कलम ३८०,४५७,५११,३२३ अन्वये दाखल गुन्हया मधील सदर इसम हा गुन्हा करतांना घरमालक अचानक आल्याने,घाबरून पळुन जात असतांना,तो तोंडावर पडुन जबर जखमी होवुन बेशुद्ध झाल्याने त्यास आळेफाटा येथील दवाखान्यात प्रथम उपचारासाठी दाखल करून, पुढील उपचारकामी ससुन हॉस्पीटल येथे ॲडमिट केले होते. त्यानंतर तेथील डॉक्टरांनी सदर इसमाचे |

पुढील उपचारकामी एच.ओ.डी.यांची वार्ड क्रं.७४ येथुन सही घेवुन येण्यास सांगितले. परंतु तेथे एच.ओ.डी. हजर नसल्याने फिर्यादी हे परत वार्ड क्रं.९ येथे आले असता,बेड नं.२५,(अ) वरील सदर इसम हा त्याचेवर उपचार सुरू असतांना,फिर्यादी हे त्यांचे वैद्यकिय उपचाराचे कागदपत्रांची पुर्तता करणेकामी गेले असताना, तो कोणास काहीएक न सांगता,स्वतःची पुढील अटक टाळणेसाठी पळुन गेला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. मधाळ ९४२२४२७८४७

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** बंडगार्डन पो स्टे १३४/२०२३,भादविक ३७९,३२३,५०४,३४

**फिर्यादी** शिवम शर्मा,वय-२६ वर्षे,रा.सोपाननगर,वडगाव-शेरी,पुणे

**आरोपीत** मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/५/२०२३ रोजी पहाटे ०२/३० वा.जहाँगीर हॉस्पीटल समोर हजरत खोजा दर्गाच्या समोरील रोडवर पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे जहाँगीर हॉस्पीटल समोर समोरील रोडवर बसले असताना,यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी सदर ठिकाणी येवुन,फिर्यादीस शिवीगाळ करुन,त्यांना हाताने मारून,नकळत त्यांचे गळयातील ५०,०००/- रू किची सोन्याची चेन घेवुन,मोटार सायकलवरुन पळुन गेले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. गावडे ९५९४९९३१९९

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोथरूड पो स्टे ११२/२०२३,भादविक ३८०

**फिर्यादी** एक ज्येष्ठ नागरीक,वय ७३ वर्षे,रा.सर्वे नं.४४,केळेवाडी,कोथरूड,पुणे

**आरोपीत** अज्ञात

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२६/०३/२०२३ रोजी सकाळी ०७/३० वा. ते दि.१६/०४/२०२३ रोजी १६/०० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरातुन

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांचे राहते घरी पलंगावर पाकीटात ठेवलेला सोन्याचा नक्षीदार राणीहार १,९१,८००/- रू किचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांची नजर चुकवुन चोरी करून नेला आहे.

**त.अंमलदार** म.पोलीस अंमलदार, ठोंबरे ९९२३१००३८२

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ३०३/२०२३,भादविक ३७९,३४

**फिर्यादी** नितिन कोकणे,वय २६ वर्षे,रा.पंचशीलनगर येरवडा,पुणे

**आरोपीत** १.एक महिला,वय ४० वर्षे,रा. गल्ली नं.७,पाटी इस्टेट,शिवाजीनगर,पुणे २.एक महिला,वय ३४ वर्षे,रा. कामगार पुतळा वसाहत,शिवाजीनगर,पुणे ३.एक महिला,वय-४५ वर्षे,रा.सदर (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०५/२०२३ रोजी पहाटे ०४/४० वा.कॉसमॉस बॅक लेनवरील सार्वजनिक रोडवर शिवाजीनगर,पुणे येथे टाटा मेंट्रो प्रोजेक्टचे साईटवर

**तपशिल** यातील फिर्यादी हे कॉसमॉस बॅक लेनवरील सार्वजनिक रोडवर चालु असलेल्या मेट्रोचे कामासाठी सुरक्षा रक्षक म्हणुन शिवाजीनगर भागात काम करीत आहेत. यातील नमुद महिला यांनी नमुद ठिकाणी चालु असलेल्या मेट्रोचे कामाचे साहित्य लेझर पाईप एकुण ०९ नग, स्टील रॉड एकुण ०३ नग असा एकुण १४,१००/- रु किमतीचा ऐवज त्यांचे पांढरे रंगाचे गोणी मधुन चोरी करुन घेऊन जात असताना,सदर ऐवजासह मिळुन आला आहे.

**त.अंमलदार** महीला पोलीस अंमलदार, एस.व्ही.केंगले ९६८९१८७९८४

## <u>दि.०७/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडक पो स्टे १४३/२०२३,भादविक ३९२

**फिर्यादी** एक नागरीक,वय ३३ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे

**आरोपीत** एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०५/२०२३ रोजी २२/३० वा. मिसाळ चौक,शिवाजी रोड,पुणे येथे सार्वजनिक रोडवर

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी पायी जात असताना,यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांना धमकावुन,त्यांच्याशी झटापटी करुन,त्यांचे पॅन्टच्या खिशात हात घालुन,खिशातुन २,५००/- रुपये रोख रक्कम,मोबाईल तसेच उजव्या हाताचे बोटातील १५,०००/- सोन्याची अंगठी जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, राकेश जाधव ०२०/२४४५२०९५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**